नि.फौ.ख.क्र. १४०/२०२३
सरकार वि. अक्षय
नि.क्र.१६

साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–राधेशाम वामनराव कांबळे,
वय ३८ वर्ष, व्यवसाय– पो.हे.कॉ.
राह. पोलिस स्टेशन उमरेड.तह.उमरेड जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री. जे.एम.बोरकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू.</u>**

१. दि.१२/०७/२०२३ रोजी मी पो.स्टे.उमरेड येथे कार्यरत होतो. सदर दिवशी मी पी.एस.आय. बट्टुलाल पांडे यांच्यासोबत रात्रीच्या कर्तव्यावर असतांना बातमीदाराकडून गुप्त माहीती मिळाली की, भिवापुरकडुन नागपुरच्या दिशेने एक निळ्या रंगाचा टिप्पर अवैधरित्या चोरट्या रेतीची वाहतु करित आहे. त्या खबरेवरून आम्ही मोहपा चौक येथे सापळा रचुन सदरच्या टीप्परला थांबवुन चालकाला त्याचे नाव,गाव विचारले असता चालकाने त्याचे नाव अक्षय आत्राम असे सांगितले. ?

२. सदर चालकाला रेतीबाबत विचारणा केली असता त्याने रेती वाहतुकीचा कोणताही परवाना नसल्याचे सांगितले. त्यावरून आम्ही सदर रेती चोरीची असल्याचे गृहीत धरून सदर घटनास्थळावर घटनास्थळ पंचनामा तयार केला व पो.स्टे. उमरेडला जाऊन मी स्वत: फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे त्यास **निशानी क्र.१७** देण्यात आला. आता मला प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशानी क्र.१८** देण्यात आला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर पंचांच्या सह्या आहेत त्यास **निशानी क्र.१९** देण्यात आला.

३. पोलिसांनी माझे बयान घेतले होते. सदर जप्त केलेल्या टिप्परचा नंबर एम.एच.४० सी.व्ही.७३२४ असा होता. मी आरोपीला पाहिल्यास ओळखतो आरोपी न्यायालयात हजर आहे ते तेच आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड.एस.ए.माटे यांच्यातर्फे उलटतपास सुरू.</u>**

४. पेट्रोलिंग करित असतांना मी कधी सरकारी वाहणाने तर कधी खाजगी

वाहणाने जात असतो. मी ज्या खाजगी वाहणाने घटनास्थळावर गेलो त्या वाहणाचा नंबर मी फिर्यादमध्ये नमुद केलेला नाही. पेट्रोलिंगला जाण्यापुर्वी हलचल रजिस्टरला केलेली नोंद मी तपासी अंमलदार यांना दिलेली नाही. मी माझे ओळखपत्र तपासी अंमलदार यांना दिलेले नाही. मी घटनास्थळ पंचनामा करण्यापुर्वी पंचांना सुचनापत्र दिले होते. आता मला अभिलेख दाखविण्यात आला त्यावर सदर सुचनापत्र दिसुन येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचांना सुचनापत्र दिले नाही व घटनास्थळ जप्ती पंचनामा पंचांसमक्ष तयार केला नाही.

५. घटनास्थळ ते पो.स्टे. यामधील अंतर पाउन ते एक किमी आहे. घटनास्थळावरून पो.स्टे. ला येण्यासाठी साधारणत: पाच ते सात मिनिटे लागतात.

**प्रश्न**-घटना सकाळी ७.१५ वाजता घडली व तुम्ही रिपोर्ट दुपारी १.०० वाजता दिला तर रिपोर्ट उशीरा देण्याचे कारण फिर्यादमध्ये नमुद केले आहे काय?

**उत्तर**-नाही.

हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादमधील मजकूर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिस कर्मचारी असल्यामुळे खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा घटनास्थळ जप्ती पंचनामा तयार केला व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि ०३.०१.२०२६

समक्ष

RAVI SATYABHAN MANKAR
order
Digitally signed by RAVI SATYABHAN MANKAR
Date: 2026.01.05 11:13:03 +0530

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड